# पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित,पिंपरी.

पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित पिंपरी

मुख्य कार्यालय : "शामा आर्केड" स. नं. १११, मेन रोड काळेवाडी, पिंपरी, पुणे ४११०१७.
फोन नं. ७२७६०९६४३१/४३२/४३४ ईमेल : admin@pcsbank.in

## वार्षिक सर्वसाधारण सभा सुचना
## (फक्त सभासदांकरिता)

या बँकेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर २०२३ या दिवशी दुपारी ठिक १२.३० वा. आचार्य अत्रे सभागृह, संत तुकाराम नगर, (वाय.सी.एम. हॉस्पिटल जवळ) पिंपरी पुणे - ४११०१८ या ठिकाणी बँकेचे माननीय अध्यक्ष **श्री. शिरीष दिनकरराव देशपांडे** यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सदर सभेस आपण प्रत्यक्ष उपस्थित रहावे, हि विनंती.

### * सभेपुढील विषय *

१) मागील दिनांक २९ सप्टेंबर २०२२ या दिवशी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या सन २०२२-२३ च्या वार्षिक अहवालाची नोंद घेणे व वैधानिक लेखा परिक्षकांनी मान्यता दिलेल्या दिनांक ३१ मार्च २०२३ अखेरच्या ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.

३) संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२२-२३ च्या नफा विभागणीस मंजुरी देणे.

४) सन २०२३-२४ या वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे व सन २०२२-२०२३ या वर्षात केलेल्या अंदाजा पेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.

५) वैधानिक लेखापरिक्षण सन २०२२-२३ अहवालाची नोंद घेणे व सन २०२१-२२ च्या दोष दुरुस्ती अहवालास स्विकृती देणे.

६) मा. संचालक मंडळाने सन २०२३-२४ करिता शिफारस केलेल्या व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मंजूरी दिलेल्या शासन मान्य नाम तालिकेतील वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे व शासन नियमानुसार मेहनताना देणेबाबत मंजूरी देणे.

७) आर्थिक वर्ष २०२३-२४ व आर्थिक वर्ष २०२४-२०२५ करिता अंतर्गत व कर लेखापरीक्षकांच्या नेमणुकीचे व त्यांचा मेहनताना ठरवण्याचे अधिकार मा .संचालक मंडळ सभेस देणेबाबत निर्णय घेणे.

८) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) नुसार) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात संचालक मंडळ सदस्य व त्यांचे कुटुंबियांना दिलेल्या कर्जाची माहिती वाचून नोंद घेणे.

९) सन २०२२-२३ या कालावधीत शासनमान्य एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत बंद केलेल्या खात्यांबाबत संचालक मंडळ सभेने मंजूर केलेल्या प्रस्तावाची नोंद घेवून त्यास कार्योत्तर मान्यता देणे.

१०) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम ४९ अन्वये बँकेच्या वैधानिक लेखा परिक्षकांनी बुडीत कर्ज म्हणून प्रमाणित केलेली कर्ज खाती बँकेचा वसुलीचा अधिकार अबाधित ठेवणेचे अटीवर सदर निर्लेखनास मान्यता देणे.

११) बँकेच्या चाकण शाखा जागा विक्रीबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

१२) बँकेच्या २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१३) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐन वेळच्या विषयांचा विचार करणे.

सभेस सर्व माननीय सभासदांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

मा. संचालक मंडळाचे सुचनेवरुन
राकेश सोमनाथ दर्जे
(मुख्य कार्यकारी अधिकारी(प्र.)

स्थळ : पिंपरी, पुणे-१७
दिनांक : ११.०९.२०२३

---

## उपस्थिती प्रमाणपत्र (सभासद प्रत)

श्री ______________________ सभासद क्रमांक ______________ हे मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित होते असे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सभासदाची सही      बँक प्राधिकृत अधिकाऱ्याची सही

---

## पिंपरी - चिंचवड सहकारी बँक मर्यादित, पिंपरी.
## उपस्थिती प्रमाणपत्र (बँक प्रत)

श्री ______________________ सभासद क्रमांक ______________ हे मंगळवार दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित होते असे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

सभासदाची सही      बँक प्राधिकृत अधिकाऱ्याची सही